ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 8 | APRIL - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# छत्रपती शाहू महाराज यांचे आर्थिक धोरण : सामाजिक न्याय समृद्धीचा अभ्यास



प्राचार्य डॉ. शिरीष नागनाथ भोसले
प्राचार्य, माऊली महाविद्यालय, वडाळा,ता.उत्तर सोलापूर जि.सोलापूर

## प्रस्तावना :

नायक हा जीवनाच्या सर्वच क्षेत्रात नायक असतो असे प्रसिध्द तत्ववेत्ते थॅमास कर्लाईन यांनी म्हटले आहे.[१] हे विधान छत्रपती शाहू महाराज यांना तंतोतंतलागू पडते. राजर्षी शाहू महाराज यांची समाजातील प्रतिमा समाजसुधारक अशी आहे आणि ती अगदी योग्यच आहे. परंतु त्या मानाने शाहू महाराजांचे आर्थिक धोरण, आर्थिक विचार समाजापर्यंत पुरेशा प्रमाणात पोहचले नाहीत. आधुनिक काळात महाराष्ट्राची जडण घडण करणाऱ्या महान महापुरुषांपैकी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे स्थान अग्रक्रमाचे आहे. आपल्या कारकिर्दीत त्यांनी खऱ्या अर्थाने लोकशाही निर्माण करून सत्ता आणि संपत्तीचा वापर जनतेच्या आर्थिक उन्नतीसाठी केला. कोल्हापूर संस्थानातील आणि संस्थानाबाहेरील शोषित, उपेक्षित, वंचित व्यक्तीला आणि व्यक्तीसामुहाला स्वाभिमानाने जगता यावे, शिक्षण घेता यावे आणि प्रगतीच्या वाट खुल्या व्हाव्यात यासाठी प्रचंड मोठी आर्थिक तरतूद केली होती. सामाजिक क्रांती बरोबर आर्थिक प्रगती हे शाहू महाराजांच्या कार्याचे मुख्य वैशिष्ट्य होते. शाहू महाराज एक दूरदृष्टीचे अर्थतज्ज्ञही होते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत सामाजिक न्याय आणि आर्थिक विकास यांचा समतोल साधत अनेक धोरणे राबवली. त्यांनी शिक्षण, शेती, उद्योग, आणि व्यापार यासारख्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा घडवून आणल्या.

## शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणाची उदिष्टे:

१) शेतकरी आणि कामगारांचा आर्थिक स्तर उंचावणे
२) सहकार चळवळीचा व उद्योगधंद्याचा विकास करणे
३) आर्थिक शिक्षणाचा प्रसार करणे
४) मागासलेल्या वर्गाचा सर्वांगीण वर्गाचा विकास करणे
५) दारिद्र्य आणि बेकारी कमी करणे

## जलसिंचन :

शाहू महाराजांच्या राज्याचा विस्तार आताच्या कोल्हापूर जिल्ह्यापेक्षा थोडा मोठा होता.संस्थानाचा मुख्य व्यवसाय शेती होता. देशातील व महाराष्ट्रातील इतर प्रदेशाप्रमाणे महाराष्ट्रात देखील दुष्काळ पडत असे. यासाठी शेतीला पाणीपुरवठ्याची गरज आहे याची जाणीव महाराजांना होती. शेती पाण्याखाली आणण्यासाठी धरण,तलाव,कालवे, विहरी, बंधारे बांधण्यासाठी प्रोत्साहन दिले व प्रचंड मोठी आर्थिक मदत केली. याचाच परिणाम म्हणून विहरीपासून ३९,८४५ एकर आणि तलावापासून २३२ एकरास, नद्यांपासून ३९,७८३ एकरास असे एकूण ७९,८६० एकरास पाणीपुरवठा होत होता.[२] राधानगरी धरण शाहू महाराजांच्या महत्त्वाकांक्षेचे आणि दूरदृष्टीचे प्रतिक आहे.

संस्थानातील सर्वात मोठे भव्य स्मारक आहे. शाहू महाराजांच्या जलनीतीची आजही दिमाखात उभी असलेली साक्ष म्हणजे राधानगरी धरण होय. शेती सिंचनाखाली आणल्याशिवाय शेतकऱ्यांचे उत्पन्नवाढणार नाही, याची स्पष्ट कल्पना असल्यामुळे महाराजांनी पाणी वापराबाबत योग्य धोरण ठरविले. राधानगरी धरण उभारण्यातून महाराजांची दूरदृष्टी दिसते. या धरणाला शंभरपेक्षा जास्त वर्षे होऊनही त्याचे बांधकाम उत्कृष्ट आहे. (१९०९ मध्ये राधानगरी धरण प्रकल्प हाती घेण्यात आला. १९१८ पर्यंत या धरणाच्या कार्यासाठी शाहू महाराजांनी १४ लाख रुपये खर्च केले. परंतु महाराजांच्या कारकीर्दीत हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही पुढे राजाराम महाराजांनी हा प्रकल्प पूर्ण करून राजर्षी शाहू महाराजांचे स्वप्न पूर्ण केले).[३] शेतीच्या विकासासठी उत्तम व्यापक आणि खात्रीशीर अशी जलसिंचन व्यवस्था शाहू महाराजांनी निर्माण केली.महाराजांनी १९०९ साली राधानगरी धरण बांधायला घेतले. ते म्हणाले " इट इज माय ड्रीम प्रोजेक्ट." १९१८ साली हे धरण पूर्ण झाले तेव्हा १४ टक्के धरण ओलीताखाली आले. सिंचनाची ही टक्केवारी गठायला फुले - शाहू - आंबेडकरांच्या महाराष्ट्राला २०१४ उजाडले. आज महाराष्ट्रात हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात. कोल्हापूर याला अपवाद का आहे? कारण शाहू राजांचा द्रष्टेपणा.[४]

## शेती :

राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्याबरोबर छत्रपती शाहू महाराजांनी सर्वप्रथम शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेतले. कोल्हापूर संस्थानामध्ये महाराजांनी शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे हे ओळखून आपल्या संस्थानात पायाभूत सुविधा निर्माण केल्याशेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न केले. शेती पारंपारिक पद्धतीने न करता आधुनिक पद्धतीने करावयास पाहिजे असे त्यांचे मत होते. संस्थानात सुधारित शेतीपद्धतीचा प्रसार करण्यासाठी १९१२ साली त्यांनी कोल्हापुरात 'किंग एडवर्ड अॅग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची' स्थापना केली. या संस्थेमार्फत सुधारीत बी-बियाणे, खते, पशुपालन यांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचू लागली. अद्ययावत शेती अवजारांचे प्रदर्शन भरवून शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक मिळू लागले.[५] शेतीच्या विकासासाठी व्हिक्टोरिया मेमोरियल फंड, किंग एडवर्ड मेमोरियल फंड याचाही वापर करण्यात आला. शेतीच्या विकासासाठी विक्टोरिया मेमोरियल फंड, किंग एडवर्ड मेमोरियल फंड याचाही वापर करण्यात आला[६] शेतीमध्ये विविध प्रयोग करत असताना चहा,कॉफी, वेलदोडे, कोको, रबर, ताग, अंबाडी, बटाटे, लाख, ट्रापिओका,कंबोडियन कापूस हि पिके लावण्याचा उपक्रम महाराजांनी केला.[७] फळबाग लागवडीसाठी महाराजांनी प्रोत्साहन दिले. आर्थिक तरतूद केली. जांभूळ, ताग, काजू, आंबा, फणस इ.च्या बागा लावायला प्रोत्साहन व प्रत्यक्ष साहाय्य केले.[८]

## उद्योग :

शाहू महाराजांनी शेतीपूरक उद्योग धंद्यांचा विकास करून त्यास सहकार तत्वाची जोड दिली. देशाचा विकास कशावर अवलंबून आहे याची जाणीव शाहू महाराजान पुरेपूर होती. त्यांच्या मते देशाची उन्नती उद्योगधंद्याच्या वाढीवर अवलंबूनआहे. हे तत्व सर्वसामान्य आहे. अशा प्रकारे उद्योगधंद्यास उत्तेजन मिळावे याविषयी मला मोठी आवड असून त्या दिशेने माझे प्रयत्न आपणास माहीतच आहेत.[९] हिंदुस्थानहा मुख्यत्वे करून शेतीचा देश आहे. पाश्यात्य राष्ट्रात भांडवलवाले आणि मजूर यांच्यात मोठी स्पर्धा चालू आहे. शेतीच्या प्रगती अभावी लोक शहरांकडे धाव घेत आहेत. परिणामी खेडी ओस पडत आहेतच परिणामी शहरे व त्यांचे त्यांचे आरोग्यही बिघडून गेले आहे. याकरिता देशाचे कल्याण ज्यांना करावयाचे आहे त्यांनी सुधारलेले तंत्र - विज्ञान शिकण्याच्या दृष्टीने शेतकरी व कारागीर यांनी पुढे आहे पाहिजे. देशाच्या उद्योगधंद्याच्या वाढीवर आपली प्रगती अवलंबून आहे. शेतीवर चालणारे कारागिराचे उद्योगधंदे हेच या दृष्टीने उपयुक्त साधन आहे.[१०] कोल्हापूर संस्थानात सुंगधी औषधी तेल,सुती कापड उद्योग,मधुमक्शिका पालन इत्यादी उद्योग सुरु केले.उद्योगधंद्यासाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ निर्मितीवर भर दिला. त्यासाठी 'राजाराम इंडस्ट्रीयल स्कूल' ची स्थापना केली. १९०४ साली शाहू महाराजांनी जपान मध्ये प्रशिक्षित झालेल्या डी.एस.शाळीग्राम नावाच्या रासायान्तज्ञ व्यक्तीची नेमणूक आपल्या संस्थानात'इंडस्ट्रीयल इन्स्पेक्टर' म्हणून नेमणूक केली.[११]

## सहकार चळवळ :

'एकमेका सहाय्य करू | अवघे धरू सुपंथ ||' या उक्तीप्रमाणे १०० वर्षापूर्वी सहकाराची मुहूर्तमेढ शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात रोवली होती. संस्थानामध्ये शेती उद्योग यांच्या विकासाला चालना देत असताना शाहू महाराजांनी सहकाराचा जोरदार पुरस्कार केला होता.कामगारवर्गाने सहकाराला प्रगतीचे मुख्य साधन मानून शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक क्षेत्रातप्रगती करून घ्यावी असे आव्हान शाहू महाराजांनी केले होते. १९१२ मध्ये सहकारी कायदा करून 'बलभीम को-ऑपरेटिव्ह सोसायट' व 'अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेची'

स्थापना केली. १९२१ पर्यंत संस्थानातील सहकारी संस्थांची संख्या३७ पर्यंत पोहचली.[१२] ग्राहक भांडार, सहकारी संघ, सहकारी उद्योग,ग्रामीण पतपुरवठा संस्था,विविध कार्यकारी सहकारी संस्था, शेतीला पाणी पुरवठा करणाऱ्या आणि साधन सामग्री पुरविणाऱ्या संस्था इत्यादी उभे करण्यासठी शाहू महाराजांनी प्रचंड मोठे आर्थिक सहाय्य केले. आज कोल्हापूरची जी प्रगती दिसते आहे त्याची पायाभरणी शाहू महाराजांनी केलेली आहे. थोडक्यात शाहू महाराजांच्या दूरदृष्टीचा उपयोग महाराष्ट्रानेच नाही तर सर्व भारताने करण्याची गरज आहे

**बाजारपेठ :**

राजर्षी शाहू महाराजांनी बाजारपेठांचं महत्त्व ओळखलं होतं. बाजारपेठा वाढवण्यासाठी त्यांनी भौगोलिक 'विकेंद्रीकरणाचा' दृष्टिकोन स्वीकारला होता. कोल्हापूर-शाहूपुरी बाजार, जयसिंगपूर याच्या जोडीला महाराजांनी सांगरूळ, पन्हाळा, कोडोली, माले, सरूड, वडगाव, गडहिंग्लज, मलकापूर, महागाव, कापशी, कागल, मुरगूड, उत्तूर, इचलकरंजी या केंद्रांत बाजारपेठा प्रोत्साहित केल्या. व्यापार-व्यवस्थेचं अर्थात वजन, मापं वह्या यांचं नियमन केलं. व्यापारी कर्ज पुरवठ्याची व्यवस्था केली. कोल्हापूर शहरापुरतेच न पाहता 'आर्थिक विकेंद्रीकरण' करण्याचा दृष्टीकोन ठेवून महाराजांनी जयसिंगपूर व गडहिंग्लज येथेही व्यापारास उत्तेजन दिले.[३] कोल्हापूरची बाजारपेठ ही मुख्यत्वे गुळाची बाजारपेठ आहे. देशभर हा गुल प्रसिद्ध आहे.म्हणून शाहू महाराजांनी कोल्हापुरात गुळाची बाजारपेठ स्थापन केली. या सर्व प्रयत्नाचे परिणाम मालाच्या निर्यातीच्या आकड्यात दिसतात. १८९४-९५ साली ही निर्यात जेमतेम ६ लाख रुपये होती तेच १९२१ साली ३० लाख रुपये झाली. ५ पट वाढ झाली झाली. व्यापारवृद्धीसाठी असे प्रयत्न केलेले संस्थानिक इतर कुणी फारसे दिसत नाही.[१४]

**रस्ते आणि रेल्वे :**

शेती, उद्योग आणि व्यापार यांच्या वाढीसाठी दळणवळणाची साधने अत्यंत महत्वाची असतात दळणवळणाच्या साधनांचे महत्व शाहू महाराज यांनी ओळखले होते शाहू महाराजांनी त्यांच्या कारकिर्दीत रस्ते बांधणीवर लक्ष केंद्रित केले होते.त्यांच्या कारकिर्दीत १८५ मैल लांबीचे नवे रस्ते तयार करण्यात आले रस्त्यांमुळे खेडी शहरांना जोडली गेलीखेड्यांतील माल शहरात येवून त्याला चांगला दम मिळू लागला. भारतातील रेल्वे प्रदीर्घ काळ खासगी मालकीचीच होती. कोल्हापूर संस्थानातील रेल्वे मात्र सरकारी क्षेत्रात सुरु झाली कोल्हापूर शहर मिरज रेल्वे जंक्शनला जोडणाऱ्या रेल्वेचे काम १८८८ मध्ये शाहू महाराजांच्या हस्ते करण्यात आले १९९१ साली ते काम पूर्ण झाले. यामध्ये १९०६ अखेर एकूण गुंतवणूक२३ लाख २६ हजार रुपयांची झाली होती.[१५]

**आरोग्य :**

छत्रपती शाहू महाराज हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते लोककल्याणकारी राजसत्तेचे आदर्श उदाहरण होते. त्यांच्या काळात शिक्षण, सामाजिक न्याय, आणि आरोग्य या तिन्ही क्षेत्रांत मोठे बदल घडवले. विशेषतः आरोग्य व्यवस्थेच्या बाबतीत त्यांनी अत्यंत प्रभावी निर्णय घेतले, जे जनसामान्यांच्या हितासाठी होते. महाराजांनी सर्वसामान्यांसाठी मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली. त्यांनी आपल्या संस्थानात सरकारी दवाखाने स्थापन केले आणि गरीबांसाठी मोफत उपचार व्यवस्था सुरू केली. शाहू महाराजांनी सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेकडे पूर्णतः लक्ष दिल्याचं दिसतं. प्लेगच्या काळात विलगीकरणाची व्यवस्था केली गेली. १९१९ च्या एन्फ्ल्यूएन्झा साथीत महाराजांनी कसोशीने सार्वजनिक आरोग्य व्यवस्था राबवली. महाराजांच्या काळापूर्वीच 'अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटल' सुरू करण्यात आलं. सध्या हेच हॉस्पिटल 'छत्रपती प्रमिलाराजे हॉस्पिटल' म्हणून ओळखलं जातं. खरं तर राजर्षी शाहू महाराजांची राज्यव्यवस्था सामान्यांच्या हितासाठी, दुर्बलांच्या मदतीसाठी सर्वांना समान न्याय देण्यासाठी होती. शेती, उद्योग, व्यापार यांच्या विकासासाठी कार्यरत होती. राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय यांचं संतुलन साधण्याचातेव्हाच्या परिस्थितीत युगप्रवर्तक प्रयोग केला, हे मान्यच करावं लागेल.[१६]

**सारांश :**

आज महारष्ट्रत कोल्हापूर जिल्हा शेती, उद्योग आणि सहकार या तिन्ही क्षेत्रात आघाडीवर असल्याचे दिसतो. कोल्हापूरच्या या आर्थिक प्रगतीचा पाया शाहू महाराजांनी शंभर वर्षापूर्वी घातला. शाहू महाराजांच्या चरित्राकडे पाहिल्यास असे दिसून येते की, त्यांनी आपली सर्व राजसत्ता, राजवैभव आणि राजकोष सर्वसामान्य जनतेच्या आर्थिक उन्नतीसाठी खर्ची घातले. 'बहुजन हिताय,बहुजन

सुखाय' हा विचार प्रत्यक्षात आणून केवळ सामाजिक क्रांतीच केली नाही तर सामाजिक क्रांतीचे रुपांतर आर्थिक क्रांतीमध्ये केलेआर्थिक विकास साधत असताना सामाजिक न्यायाचे संतुलन साधले आपणास मिळालेला राज्याधिकार हा राजवैभव व राजविलास यांचा उपभोग घेण्यासाठी नसून, तो रंजल्यागांजल्या प्रजाजनांच्या उद्धारासाठी आहे ही राजाच्या 'उपभोगशून्य स्वामित्वाची' जाण महाराजांच्या ठायी होती.[१७]

पु.ल.देशपांडे म्हणतात, महाराष्ट्राच्या राजाच्या गळयात कवड्यांची माळ असे म्हणतात. मला ती माळ फार सूचक वाटते. लोकांचा राजा म्हणून ज्याला जगायचे असते त्याने स्वतःचे जीवन कवडी मोल मानायची तयारी ठेवावी लागते. उपभोगशून्य स्वामी ह्यासारखी सत्ताधीशाला सुंदर बिरुदावली नाही. शाहू महाराजांना ती लाभलेली होती.[१८] एका अमेरिकी इतिहासकाराला राजर्षी शाहू महाराजांच्या भूमिकेचे फार आश्चर्य वाटते तो म्हणतो, इतका मुलगामी सामाजिक दृष्टिकोन फुल्यांसारख्या एका शेतकरी कुटुंबात आढळणे हे समजण्यासारखे आहे पण शाहू महाराजांसारख्या एका राजामध्ये दिसून येणे ही फार थक्क करणारी गोष्ट आहे[१९] रस्किनची जी 'Un top the last' ही कल्पना होती तीच त्यांनी उचलून धरून समाजातल्या अंत्यज्योधाराच्या कल्पनेलाच त्यांनी प्रथम हात घातला[२०] कवी बंकिमचंद्रच्या ' सुजलाम सुफलाम 'गीतातील शब्दात म्हटल्याप्रमाणे,

व्हावी मातृभूमी सुजल सुफला
स्थापत्य प्रज्ञा स्फुरे |
केली श्रांत सुपीक मायभूमीला
आणून मोठे झरे||[२१]

राजर्षी शाहू महाराज महाराष्ट्राचा मानबिंदू आहेत नवयुगातले सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष आहेत. मानवतेचे, उदारतेचे आणि पुरोगामीत्वाचे प्रतीक आहेत. विद्यमान भारतातील सामाजिक व आर्थिक लोकशाही जशी जशी यशस्वी होत जाईल तशी तशी शाहू महाराजांच्या कर्तृत्वाची दखल इतिहासात घेतली जाईल.

**संदर्भ :**


१) डॉ.जाधव रमेश , *शाहू महाराज आणि आपत्ती व्यवस्थापनाचा मानदंड* , सकाळ, २६ जून २०२०

२) डॉ.पवार जयसिंगराव ,*राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ* ,महाराष्ट्र इतिहास प्रभोधिनी, कोल्हापूर प्रथमावृत्ती, जानेवारी २००१ पृ.६२६

३) डॉ.प्रवीण बनसोड, *कृषीधोरण, जलनीती राजर्षी शाहूंकडून शिका* लोकसत्ता, २६ जून २०२२

४) प्रा.हरी नरके , *छ.शाहूराजांचा रीलेव्हन्स काय?* मॅक्स महाराष्ट्र , २६ जून २०२०

५) डॉ.प्रवीण बनसोड , *कृषीधोरण, जलनीती राजर्षी शाहूंकडून शिका* लोकसत्ता, २६ जून २०२२

६) प्रा.डॉ. पाटील जे. एफ. *आर्थिक विकास, सामाजिक न्यायाचं संतुलन साधणारा राजा* कोलाज,२६ जून २०२२

७) डॉ.पवार जयसिंगराव ,*राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ* ,महाराष्ट्र इतिहास प्रभोधिनी, कोल्हापूर प्रथमावृत्ती, जानेवारी २००१ पृ.६२६

८) कित्ता. पृ.६२६

९) डॉ.भोसले एस.एल,*क्रांतीसुक्तेःराजर्षी छत्रपती शाहू*,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती महामंडळ ,मुंबई ,तृतीय आवृत्ती,जुलै २००६ पृ. १३२

१०) डॉ.भोसले एस.एल.,*क्रांतीसुक्तेः राजर्षी छत्रपती शाहू*,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती महामंडळ ,मुंबई ,तृतीय आवृत्ती, जुलै २००६ पृ. १३३

११) डॉ.पवार जयसिंगराव ,*राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य* ,ताराराणी बुक सर्विसेस कोल्हापूर प्रथमावृत्ती,२०१४ पृ.९१

१२) डॉ.पवार जयसिंगराव ,*राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ* ,महाराष्ट्र इतिहास प्रभोधिनी, कोल्हापूर प्रथमावृत्ती, जानेवारी २००१ पृ.२०९

१३) उपरोक्त,६२५

१४) उपरोक्त,६३०

१५) उपरोक्त,६२८

१६) प्रा.डॉ. पाटील जे. एफ. *आर्थिक विकास, सामाजिक न्यायाचं संतुलन साधणारा राजा* कोलाज,२६ जून २०२२

१७) डॉ.पवार जयसिंगराव, लोकोत्तर राजा, लोकसत्ता ,१ मे २०२२

१८) डॉ.पवार जयसिंगराव ,*राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ* ,महाराष्ट्र इतिहास प्रभोधिनी , कोल्हापूर प्रथमावृत्ती,जानेवारी २००१ पृ.४७१
१९) लोकराज्य,*राजर्षि श्री शाहू महाराज राज्यारोहण शताब्दी विशेषांक*, १ ऑगस्ट १९९४, पृ. १५
२०) कित्ता, १५
२१) उपरोक्त,५१